# मराठी कवितेवर पडलेला गांधी विचारांचा प्रभाव

**डॉ.सुजय बाबूराव पाटील,** प्राध्यापक व प्रमुख मराठी विभाग, कमला कॉलेज, कोल्हापूर.

---

**प्रस्तावना :**

सत्यासाठी जगलेल्या आणि सत्यासाठी मरण पत्करलेल्या महात्मा गांधी या व्यक्तिमत्वाने भारत देशावर नव्हे तर संपूर्ण जगावर स्वत:चा वैचारिक प्रभाव टाकलेला आहे.

त्यामुळेच प्रत्येक शतकातील महनीयव्यक्तींनी मग ते राजकीय असोत की, सामाजिक, वैज्ञानिक क्षेत्रातील असोत त्यांनी महात्मा गांधी यांना सदैव वंदनीय मानलेलं आहे.

त्यामुळेच 'महात्मा गांधी नावाचा हाडामासांचा एक माणूस या पृथ्वीतलावर होऊन गेला. यावर पुढील पिढ्या कदाचित विश्वास ठेवणार नाहीत. असे उद्गार विख्यात शास्त्रज्ञ आईनस्टाईन यांनी काढलेले आहेत. तर नेल्सन मंडेला, मार्टिन ल्युथर किंग (ज्यु) यांनी आपल्या सामाजिक चळवळींचा आधारम. गांधी यांचा विचारच मानलेला होता.

आपल्या देशातील व पर्यायाने जगभरातील अनेक कथा, कादंबऱ्या, कविता, नाटक, सिनेमे इत्यादी सर्व वाङ्मय प्रकारात म. गांधींचे व्यक्तिमत्व एखाद्या आकाराप्रमाणे पसरलेले दिसून येते. मराठी भाषा देखील त्याला अपवाद नाही. स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर कालखंडातील मराठी साहित्याचे नायक म. गांधीच असल्याचे आपणास दिसून येते. मराठी कवितेत कवितेच्या प्रांतात तर म. गांधी यांच्यावर विपुल लेखन झालेले दिसून येते.

ज्याच्या साम्राज्याचा सूर्य कधी मावळत नाही असं म्हणणाऱ्या ब्रिटिश साम्र्याज्याने पहिल्यांदा गांधीजींची हेटाळणी केली. नंगा फकीर म्हणून अहवेलना केली. गांधी व त्यांच्या आंदोलनाला एका हाती चिरडून टाकू म्हणणाऱ्या इंग्रज सरकारला शेवटी हात चोळीत बसण्याशिवाय प्रर्याय उरला नाही. भारतमातेच्या मानेवर बसलेले 'साम्राज्यशाहीचे भूत' सत्य, अहिंसा यांचा मंत्र म्हणत गांधी सहजच उतरवून टाकले. गांधीजींच्या या सामर्थ्याचे 'फकीर' या आपल्या कवितेत वर्णन करताना कवी राजा मंगळवेढेकर लिहितात-

'सूर्य जिच्यावर माळवत नाही
ज्यांचा सागरावर दरारा
त्यांना मात्र, फकीराची धास्ती।
वदली 'अर्धनग्न फकीर।
हसली तुच्छतेने धुंदीत
हाताच्या मुठी वळून म्हणे, 'टाकीन यास चिरडून'
पण पाळी आली हात चोळण्याची।
साम्राज्यशाहीचे पिशाच्च काढण्याकरिता
सत्य अहिंसेचा मंत्र गात गात बजावले-
चले जाव –चले जाव –चले जाव।।
ना मशीद ना काही मला
ना हीच प्रशस्त मशीद
नी चुकलेला फकीर हा
दिसेल अभागिनींचे अश्रू पुसतांना'

तत्कालीन समाजजीवनात प्रत्येक कुटुंबांमधील सदस्यंच्यावर म. गांधी यांच्या विचारांचा प्रभाव होता. म. गांधी यांच्या सत्याग्रहामुळे देशाला स्वातंत्र्य तर मिळणारच पण त्यांच्या विचारामुळे भूत-वर्तमान व भविष्यातील आपल्या सर्व पिढ्यांचा उद्धार होईल असा आत्मविश्वास प्रत्येक भारतीयाला होता. हा आत्मविश्वास व्यक्त करतांना ज्येष्ठ कवी बा. भ. बोरकर आपल्या ‘साबरमतीच्या काठी’ या कवितेमध्ये लिहितात-

महात्म्याच्या पावलांनी येथे धूळ झाली बुका धूप यायचा ता
हवेमध्ये श्वास त्याचे धूप यायचा ना तुका
तुझी भक्ती, तुझा त्याग तुझे तप आले फळा
माझ्या भविष्याचा मार्ग मला झाला ग मोकळा
महात्म्याच्या संगतीचा मला लाभला एकान्त
सहा महिन्यात झाला खरा स्वप्नीचा दृष्टांत
त्याने उचलेला भार सारी निरसली चिंता
त्याच्या पावलांच्या जळी सोडू आसक्ती अहंता
चरक्यांच्या तालावर रचू त्याचे रामायण
जीवनात पदोपदी करू त्याचे पारायण
त्यात आहे आपुल्या जीवनाची फलश्रुति
पितरांची, वंशजांची आम्हा सर्वांचीच मुक्ती.

टिळकांच्या निधनानंतर १९२० साली नंतर हा स्वातंत्र्याला लढा पुढे कोण चालविणार असा प्रश्न भारतीय समाजासमोर उभा होता. महात्मा गांधी यांच्या रूपाने या स्वातंत्र्य लढ्याला प्रभावी नेतृत्व मिळाले. या नेतृत्वाने अंगिकारलेल्या सत्याग्रह, सविनय कायदेभंग, दांडीयात्रा इत्यादी स्वातंत्र्य चळवळींच्या साधनांमुळे इंग्रज सरकारला सातासमुद्रापार घालवून देऊ असा आत्मविश्वास तमाम भारतीय जनतेच्या मनात निर्माण झाला होता. ही भावना व्यक्त करतांना कवी प्रा. वंसत बापट ‘शिंग फुंकले रणीं’ या आपल्या कवितेत लिहितात-

‘लोकमान्य केसरी गर्जतात वैखरी
माजला असे अरी चारू त्याजला खडे
वीस सालचा लढा जाहला किती बडा
इंग्रजास बेरडा आणिले कसे रडे
तीस सालची प्रभा उज्ज्वला भारी नभा
गांधी अग्रणी उभा ठाकला रणीं पुढे
शीर घेउनी अरी दंग होऊ संगरी
घालवू चला अरी सागरपलिकडे

महात्मा गांधींच्या प्रयत्नाने भारतमाता ब्रिटिशांच्यागुलामगिरीमधून मुक्त झाली. याविषयी ‘कळस’ या आपल्या कवितेतून कृतज्ञता व्यक्त करतांना कवी गिरीश लिहितात-

महात्मन करितो जयजयकार
स्वतंत्रतेचे भारत मंदिर झाले हो साकार।
हृदयभावाची फुले वाहुनी
रमतो मंगल भावपूजनी

फडकावूनी कळसावर हा
तिरंगीच अवतार'

म. गांधीजी यांच्या नेतृत्वावर, त्यांच्या स्वातंत्र्यासाठीच्या विविध प्रयोगावर जशा कविता लिहिल्या गेल्या तशाच प्रकारे त्यांची हत्या झाल्यानंतर शोक, राग व्यक्त करणाऱ्या अनेक 'विलापिका' लिहिल्या गेल्या त्यातून म. गांधींच्या कार्याची थोरवी तर समजतेच पण याचबरोबर गांधींचा खून करणाऱ्या पाशवी वृतींचा धिक्कार देखील दिसून येतो. त्यामुळेच कवी मनमोहन नातू आपल्या 'पांडूरंगाची वाट' या कवितेत लिहितात-

त्या भीषण संध्याकाळी
जुम्मा मशिदीचा घुमट तडकला
कार्ल्याच्या स्तूपालाही तडा गेला
आयफेल टॉवर मानवंदनेसाठी झुकला
आता साऱ्या भाषेतील कोश दु:ख शब्द झाले

स्वातंत्र्याच्या चळवळी बरोबर म. गांधींनी चालवलेली दास्यमुक्तीची, अस्पृश्यता मुक्तीची, वेठबिगार मुक्ती इत्यादी समाजसुधारणांच्या चळवळी काही कर्मठ मनोवृत्तींना पटल्या नाहीत. त्यामुळेच नथुराम गोडसे या नराधमाने म. गांधी यांची गोळ्या झाडून हत्या केली. सामाजिक परिवर्तनाच्या चळवळी उभ्या करणाऱ्या चार्वाक, चक्रधर, ज्ञानेश्वर, तुकाराम, शाहू महाराज यासारख्या थोर महात्म्यांना देखील असाच त्रास सहन करावा लागला अशी भावना व्यक्त करतांना 'मृत्यूने गांधीजी अमर जाहले' या आपल्या प्रबोधनपर अभंगात प्रा. डॉ.जे.बी.शिंदे लिहितात-

बळी जाऊनही । बळी धन्य झाला
लोक वामनाला । शिव्या देती ॥१॥
चार्वाक प्रखर। शुद्ध बुद्धिनिष्ठ
तेजहीन कर्मठ। केले त्याने ॥२॥
थोर चक्रधर। मानवतावादी
हेमाडपंताहाती । बळी झाला ॥३॥
लोकभाषेसाठी । झटे ज्ञानेश्वर ।
जाति बहिष्कार । सोसूनिया ॥४॥
वेद अर्थहीन। तुकाराम म्हणे।
मोल हौतात्म्याने फेडितसे ॥५॥
भिक्षुकशाहीने शाहूंना छळले
बदनाम केले जिजाऊंना ॥६॥
मृत्यूने गांधीजी अमर जहाले
कलंकित झाले मारणारे ॥७॥

तर कवी सुर्यकांत खांडेकर 'आज युगाचा अन्न जाहला।' या आपल्या कवितेत लिहितात-

'विश्वशांतिचा प्रेषक गेला आज जगापार
छातीवरती वज्रफुलांचे झेलुनिया वार
दाहि दिशा या गाती अजूनीकरुण गीत आर्त
बुडूनी गेले विश्वचि सारे शोकसागरांत।

शांतिमहात्म्या । आज युगाचा झाला जरि अंत
मानवतेची हक तुझी पण घुमते विश्वांता।'
कोणत्याही इतिहासाला पुसून काढता येणार नाही.

**समारोप :**

अशा प्रकारे स्वातंत्र्यपूर्व, स्वातंत्र्योत्तर व आधुनिक कालखंडातील मराठी कवितेमधील गांधी यांचे विचारदर्शन म. गांधी यांचे मोठेपण जसे सांगून जाते त्याचबरोबर म. गांधींच्या विचारातील आवाहकता अधोरेखित करते.

**निष्कर्ष:**

- म. गांधींचे व्यक्तिमत्व जगभरातील विविध साहित्य प्रकारांचा अभ्यास विषय झालेले आहे.
- भारतातील विविध भाषांमधून विविध वाङ्मयप्रकारामधून म.गांधींचे व्यक्तिमत्व आजही चित्रित केले जाते.
- मराठी कवितेने गांधी विचार दर्शन घडवून मराठी सारस्वत समृद्ध केलेले आहे.
- या कवितांच्या मधून स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर भारतीय समाजाचे विस्तृत समाज दर्शन घडते.

**संदर्भ :**

१) मराठी कवितेतील गांधी दर्शन, संपादक - प्रा. डॉ.जे.बी.शिंदे, स्वरूप प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती, २०२३.
२) गांधीजी, लेखक –पु. ल. देशपांडे, राजहंस प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती, १९७०.